**(बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १५व्या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यात शिकागो महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. मिलिंद पानट यांनी केलेले भाषण - शिकागो, २२ जुलै २०११)**

नमस्कार माझ्या बंधू आणि भगिनींनो -

नुकत्याच मुंबईत झालेल्या भ्याड बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर आपण आज भेटत आहोत. ह्या स्फोटांचे लक्ष एकच असते ते म्हणजे दहशदवाद आणि जनजीवन विस्कळीत करणे. मुंबईकरांनी सुद्धा पुन्हा एकदा आपल्या कृतीतून चोख उत्तर दिले. दुसऱ्या दिवशी तो उठून उभा राहिला आणि कामाला लागला. ह्या स्फोटात बळी पडलेल्या नागरिकांचे स्मरण करून आणि मुंबईकरांच्या विजीगिषु वृत्तीला सलाम करून आपण पुढील कार्यक्रमाची सुरवात करूया.

काहीच मिनिटांपूर्वी आपण ह्या अधिवेशांचे स्वरबद्ध केलेले घोषवाक्य ऐकलत. जरी विश्वात्मा होऊ, अंतरी मराठी राहू!". हे बोधवाक्य जरी ज्ञानेश्वरीतून घेतल्यासारख वाटत वाटत असलं तरी ह्याचे कवी आहेत शिकागोचेच श्री. सुहास तांबे! ह्या वाक्याची आधीची ओळ आहे "उंच भरारी असे आपली, उरी सह्याद्री साठवू. जरी विश्वात्म होऊ, अंतरी मराठी राहू!".

आज येथे जमलेली प्रत्यक व्यक्ती, आपल्या माय देशापासून दूर, आपल्या कर्मभूमीत यशाच्या आणि कर्तृत्वाच्या उंच भराऱ्या मारतच आहात पण आपल्या मनातला सह्याद्री अजून जागा आहे आणि ताजा आहे हे आपल्या उपस्थितीने आपण सिद्ध केलं आहे. मराठी भाषा, संस्कृती आणि गौरवशाली इतिहास ह्यावरील प्रेमामुळेच आज आपण येथे जमलेलो आहोत ह्या जाणीवेने ऊर भरून येत आहे.

एका प्रगतीशील, पुरोगामी आणि अतिशय श्रीमंत सांस्कृतिक वारसा लाभलेल्या आणि ज्ञानदेवांपासून ते शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मातीशी नातं सांगणारे आणि महाराष्ट्राची अस्मिता जपणारे आपण सर्वजण आज आग्रहाने येथे आलात - आम्ही धन्य झालो!

मराठी भाष्या ऱ्हास पावते की काय अशी शंका उपस्थित करणाऱ्या लोकांसाठी बृहन महाराष्ट्र मंडळाचे हे अधिवेशन म्हणजे खणखणीत उत्तर आहे. आपल्या रोजच्या व्यवहारात आपण इंग्रजी भाषेचा वापर करणे अपरिहार्य आहे पण जेव्हा समूह म्हणून आपण एकत्र येतो तेव्हा उस्फूर्तपणे आपण वापरतो ती मराठी. मनात  असते ती मराठी आणि अंतरातून येणारी मराठीच.

महाराष्ट्रापासून दूर राहून आपण जी मराठी जपलीत, फुलवलीत आणि पुढच्या पिढीकडे सुपूर्द केली याचा आविष्कार कार्यक्रमांच्या माध्यमातून आज आपल्याला अनुभवायला मिळणार आहे. भारतातून येणारे कार्यक्रम बघायला आपण सर्वजण उत्सुक असतोच पण उत्तर अमेरिकेतील कार्यक्रम आणि विशेषतः आपल्या पुढच्या पिढीने सदर केलेले कार्यक्रम आपण बघाल आणि त्यांना प्रोत्साहन द्याल आशी माझी खात्री आहे.

आमचे सर्व देणगीदार, जाहिरातदार आणि हितचिंतक यांचे मी मनापासून स्वागत करतो आणि आभार मानतो. महाराष्ट्र मंडळ शिकागोचे कार्यकर्ते आणि मिडवेस्ट मधील आठ मराठी मंडळे यांच्या पाठीब्याशिवाय हे संमेलन होणे कठीण होते. त्यांचेही मी आभार मानतो. सर्वात शेवटी - ज्यांचासाठी हा अधिवेशनाचा घाट घातला आहे,म्हणजेच तुम्ही सर्वजण - तुम्हा सर्वांचे मी पुन्हा एकदा स्वागत करतो आणि माझे भाषण आटोपते घेतो.

जय महाराष्ट्र!